डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत काटोल, जि.नागपूर येथे शासकीय उद्यानविद्या महाविद्यालय स्थापन करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक : पंदेवि-१३२४/प्र.क्र.१९०/ई क्र.९४८४९१/७-अे

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १८.०८.२०२६

प्रस्तावना :-

विदर्भ हा प्रामुख्याने ११ जिल्हयांमध्ये विभागला असून महसूल विभागानुसार याचे अमरावती आणि नागपूर असे दोन विभाग करण्यात आले आहेत. उद्यानविद्या क्षेत्रामध्ये प्रामुख्याने फळे, भाजीपाला, फुले तसेच, प्रक्रिया व मूल्यवर्धन इत्यादी महत्त्वाच्या शाखांचा अंतर्भाव केला जातो. पारंपारिक पीक पध्दतीमध्ये पीक बदलही एक नविन संकल्पना मोठ्या प्रमाणात अंमलात येत आहे. अमरावती महसूल विभागात संत्रा, मोसंबी, आंबा, लिंबू, पेरु इत्यादी व मुख्य फळपिकांव्यतिरिक्त कमी पाण्यावर तग धरणारी आवळा, सिताफळ या फळपिकांचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे. यासोबतच शास्त्रोक्त पध्दतीने बिगर हंगामामध्ये (वर्षभर) हरितगृह तंत्रज्ञानाचा वापर करून भाजीपाल्याचे दर्जेदार उत्पादन घेतले जात आहे. तसेच, फुलशेतीला देखील बऱ्याच ठिकाणी चालना मिळाली आहे.

नागपूर जिल्हयात “काटोल” हा महाराष्ट्र राज्यातील नागपूर जिल्ह्यातील फलोत्पादनाच्या दृष्टिने महत्त्वाचा तालुका आहे. नागपूर जिल्हयापासून हा तालुका सुमारे ५६ कि.मी. अंतरावर स्थित आहे. काटोल तालुक्याचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान ९२१.०० मि.मी. आहे. काटोल तालुक्यास लाभलेल्या २८४६४ हेक्टर एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी सिंचनाखालील क्षेत्र सुमारे ७४२३ हेक्टर आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक व आर्थिक दर्जा प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातून नवीन उद्यानविद्या महाविद्यालय निश्चितच उपयोगी ठरेल.

कृषि विद्यापीठाव्दारे विकसित व आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून फळे, भाजीपाला व फुलांचे उत्पादनामध्ये वाढ होत असल्यामुळे विदर्भात छोटया व मोठ्या प्रक्रिया उद्योगाला चालना मिळण्यास चांगलाच वाव आहे.

सद्यस्थितीत विदर्भामध्ये, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत एकच शासकीय घटक उद्यानविद्या महाविद्यालय, अकोला येथे कार्यरत असून अमरावती व बुलढाणा येथे विद्यापीठ संलग्नित, प्रत्येकी एक, विनाअनुदानीत उद्यानविद्या महाविद्यालये अशी एकूण तीन उद्यानविद्या महाविद्यालये कार्यरत आहेत. नागपूर जिल्हयातील फळे, भाजीपाला व फुलशेतीची विविधता बघता

प्रस्तावित केलेल्या उद्यानविद्या महाविद्यालयाची, नागपूर जिल्हयातील काटोल, या तालुक्याच्या ठिकाणी नितांत आवश्यकता असून विविध फळपिकांवर संशोधन करण्याकरिता येथे भरपूर वाव आहे, असे डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांनी नमूद केले आहे.

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत काटोल, जि.नागपूर येथे सदर प्रस्तावित नवीन शासकीय घटक उद्यानविद्या महाविद्यालय स्थापन करण्यासाठी, सहाव्या अधिष्ठाता समितीच्या निकषानुसार १५ हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. काटोल तालुक्यामध्ये डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत प्रादेशिक फळ संशोधन केंद्र कार्यरत आहे. येथे विद्यापीठाच्या मालकीची ४५.४८ हेक्टर इतकी जमीन उपलब्ध आहे.

राज्य कृषि परिषदेने, ठराव क्र.८३/११७ वी बैठक, दि.०३.१०.२०२४ अन्वये, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत काटोल, जि.नागपूर येथे सहाव्या अधिष्ठाता समितीच्या शिफारशीनुसार नवीन शासकीय उद्यानविद्या महाविद्यालय १२० विद्यार्थी प्रतीवर्ष क्षमतेने स्थापन करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे. त्यास अनुसरुन डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत काटोल, जि.नागपूर येथे शासकीय उद्यानविद्या महाविद्यालय स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

१. डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत काटोल, जि.नागपूर येथे १२० विद्यार्थी प्रती वर्षी प्रवेश क्षमता असलेले, **शासकीय उद्यानविद्या महाविद्यालय** सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या सहाव्या अधिष्ठाता समितीच्या निकषानुसार शिक्षकवर्गीय २७ पदे आणि सहयोगी अधिष्ठाता व शारिरीक शिक्षण निदेशक संवर्गातील प्रत्येकी १ पद, अशी एकूण २९ शिक्षकवर्गीय पदे, त्याचप्रमाणे, शिक्षकेतर नियमित २२ पदे अशी एकूण **५१ नियमित पदे उच्चाधिकार समितीच्या मान्यतेच्या अधीन राहून निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे**.

३. त्याप्रमाणे, शिक्षकवर्गीय (गट अ ची ५) आणि शिक्षकेतर (गट क ची ८) व (गट ड ची २२) अशी एकूण ३५ पदे आवश्यकतेनुसार कंत्राटी स्वरुपात भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. शासकीय काटोल उदयानविद्या महाविद्यालयासाठी शिक्षकवर्गीय व शिक्षकेतर पदांच्या वेतनासाठी रु.३५८७.४६ लाख, आवर्ती खर्च रु.१०३१.६७ लाख व अनावर्ती खर्च रू.७६१३.४३ लाख असा एकूण रु.१२२३२.५६ लाख खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

५. उद्यानविद्या महाविद्यालयासाठी लागणाऱ्या खर्चाचा तपशील पुढीलप्रमाणे-

(रुपये लाखात)

अ.क्र.	खर्चाचे विवरण	पहिले वर्ष	दुसरे वर्ष	तिसरे वर्ष	चौथे वर्ष	पाचवे वर्ष	एकूण खर्च
१	वेतन	४६३.८	६७३.०६	७४०.३६	८१४.३९	८९५.८५	३५८७.४६
२	आवर्ती खर्च	६०९.४५	११६.७	१२७.३	११५.२	१२३.४	१०३१.६७
३	अनावर्ती खर्च	७६१३.४३	००	००	००	००	७६१३.४३
	एकूण खर्च	८६८६.६८	७८९.७६	८६७.६६	९२९.५९	१०१९.२५	१२२३२.५६

६. शासकीय उद्यानविद्या महाविद्यालयासाठी आवश्यक मनुष्यबळ व इतर सोयी-सुविधा उपलब्ध झाल्यानंतर विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

७. या बाबीकरीता येणारा खर्च (२४१५ ००९९) या लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पित केलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

८. सदर शासन निर्णय मा.मंत्रिमंडळाच्या बैठक, विषय क्रमांक ०५, दि.२१.०७.२०२६ रोजी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने, तसेच, वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३६०/२०२६/व्यय-१,दि.१३.०८.२०२६ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०८१८१९५५५९८५४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATIBHA MADHAV PATIL

Digitally signed by PRATIBHA MADHAV PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and Adf Dept,
2.5.4.20=B693D975FFFC642FE6B87C2CE9E1297FD1E8BDA9B459F85F75F159984BA680FD, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DA026E85AE8CBB4E3C2ACDBECBBF2F6D6CB0AE6ED5C1E54483490119EE0456AD, cn=PRATIBHA MADHAV PATIL
Date: 2026.08.18 19:56:53 +05'30'

(प्रतिभा पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा.उपमुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव{नगर विकास विभाग, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)}मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री, यांचे सचिव (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास विभाग), मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मंत्री (फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.राज्यमंत्री (कृषि) मंत्रालय, मुंबई.
७. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई
८. मा.सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
९. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
१०. सर्व मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य, विधानभवन, मुंबई.
११. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
१२. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे.

१४. वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
१५. कुलगुरु, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
१६. कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
१७. विद्यापीठ अभियंता, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
१८. नियंत्रक, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
१९. अधिष्ठाता, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
२०. संचालक (शिक्षण), डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
२१. संचालक (संशोधन), डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
२२. संचालक (विस्तार शिक्षण व साधन सामुग्री), डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
२३. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा), मुंबई/ नागपूर.
२४. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२५. सहायक लेखाधिकारी, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
२६. मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
२७. उप मुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
२८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२९. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
३०. कार्यासन ७-अे (निवडनस्ती).